**"मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता" विधानसभा क्षेत्र निहाय प्रशासकीय मान्यता देण्याकरीता निधीची मर्यादा निश्चित करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**R&FD-८६०३२/१/२०२५-PANAND RASTE-Revenue and Forest /(E- १४८९४९०)**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: २९ जून, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५
२. शासन पत्र क्रमांक R&FD-८६०३०/१७/२०२६-PANAND RASTE दि. ३०.०५.२०२६
३. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र. R&FD-८६०३२/१/२०२५-PANAND RASTE-Revenue and Forest /(E- १४८९४९०) दि. २३.०६.२०२६

**प्रस्तावना :-**

दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिनांक दि. ०७.०१.२०२६ , दि.१८.०२.२०२६, दि.२५.०३.२०२६ व दि.१५.०४.२०२६ रोजी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथील दिनांक ३०.०५.२०२६ रोजीच्या शासन पत्रान्वये, सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. संदर्भाधीन अनुक्रमांक ३ येथील दि. २३.०६.२०२६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३०.०५.२०२६ रोजीचे शासन पत्र रद्द करण्यात आले आहे व विधानसभा क्षेत्र निहाय प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या निधीच्या मर्यादेच्या सुधारीत यादीस (प्रपत्र अ, ब व क) शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयामध्ये उर्वरित विधानसभा क्षेत्रातील मतदारसंघातील प्रशासकीय मान्यतेकरीता द्यावयाच्या निधीच्या मर्यादेबाबत यथावकाश कळविण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार मान्यता दिलेल्या विधानसभा क्षेत्र निहाय प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या निधीच्या मर्यादेच्या यादी (प्रपत्र अ, ब व क) मध्ये प्रपत्र ड चा समावेश करण्यात येत आहे. याअनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर पुढीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत:

१) मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेकरिता या शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे (प्रपत्र ड) विधानसभा क्षेत्रनिहाय निधीच्या मर्यादेत घ्यावयाच्या रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

२) या योजनेच्या संनियंत्रणासाठी स्वतंत्र वेबपोर्टल सुरू करण्यात आलेले आहे. निश्चित केलेल्या सर्व शेत/पाणंद रस्त्यांना तात्काळ विशिष्ट क्रमांक देणे (Unique Numbering) व प्रोजेक्ट आयडी (Project ID निर्माण करण्याची कार्यवाही करावी.

३) तसेच प्रोजेक्ट आयडी निर्माण केलेल्या कामांचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रीक व प्रशासकीय मान्यता देणे व कार्यादेश देण्याची कार्यवाही करावी.

४) संबंधित कंत्राटदारांमार्फत शेत/पाणंद रस्त्यांचे ५० टक्के काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्यानंतरच, सदर कामाकरिता निधीची मागणी (शासनाकडे नोंदवावी.

५) शेत/पाणंद रस्त्यांचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर, विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीने कामाचे अधिकृत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (Work Completion Certificate) तात्काळ शासनास सादर करावे.

२. उर्वरित विधानसभा क्षेत्रातील मतदारसंघातील प्रशासकीय मान्यतेकरीता द्यावयाच्या निधीच्या मर्यादेबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२९१८०८५३०४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.06.29 18:10:41 +05'30'

**(प्रतापसिंह म. खरात)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व पोलीस अधिक्षक.
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१८.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र 1 व 2. मुंबई व नागपूर.
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र 1 व 2. मुंबई व नागपूर.
२०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१. सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२२.निवडनस्ती (पाणंद रस्ते)

| प्रपत्र - ड | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **जिल्हा** | **विधानसभा क्षेत्राचे नाव** | **प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या रकमेची मर्यादा (रु.कोटी)** |
| १ | पालघर | पालघर | ४.०० |
| २ | पालघर | बोईसर | ४.०० |
| ३ | ठाणे | भिवंडी ग्रामीण | ४.०० |
| ४ | ठाणे | कल्याण ग्रामीण | ४.०० |
| ५ | रायगड | कर्जत | ४.०० |
| ६ | रायगड | अलिबाग | ४.०० |
| ७ | रायगड | महाड | ४.०० |
| ८ | रत्नागिरी | दापोली | ४.०० |
| ९ | रत्नागिरी | रत्नागिरी | ४.०० |
| १० | रत्नागिरी | राजापुर | ४.०० |
| ११ | सिंधुदुर्ग | कुडाळ | ४.०० |
| १२ | सिंधुदुर्ग | सावंतवाडी | ४.०० |
| १३ | पुणे | पुरंदर | ४.०० |
| १४ | पुणे | जुन्नर | ४.०० |
| १५ | सातारा | पाटण | ४.०० |
| १६ | कोल्हापूर | राधानगरी | ४.०० |
| १७ | कोल्हापूर | करवीर | ४.०० |
| १८ | कोल्हापूर | शिरोळ | ४.०० |
| १९ | सांगली | खानापूर | ४.०० |
| २० | नंदुरबार | अक्कलकुवा | ४.०० |
| २१ | धुळे | साक्री | ४.०० |
| २२ | जळगाव | चोपडा | ४.०० |
| २३ | जळगाव | जळगाव ग्रामीण | ४.०० |
| २४ | जळगाव | एरंडोल | ४.०० |
| २५ | जळगाव | पाचोरा | ४.०० |
| २६ | जळगाव | मुक्ताईनगर | ४.०० |
| २७ | नाशिक | नांदगाव | ४.०० |
| २८ | नाशिक | मालेगाव बाह्य | ४.०० |
| २९ | अहिल्यानगर | संगमनेर | ४.०० |
| ३० | अहिल्यानगर | नेवासा | ४.०० |
| ३१ | नांदेड | नांदेड उत्तर | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | नांदेड | नांदेड दक्षिण | ४.०० |
| ३३ | हिंगोली | कळमनुरी | ४.०० |
| ३४ | जालना | धनसावंगी | ४.०० |
| ३५ | जालना | जालना | ४.०० |
| ३६ | छत्रपती संभाजीनगर | सिल्लोड | ४.०० |
| ३७ | नांदेड | हदगाव | ४.०० |
| ३८ | छत्रपती संभाजीनगर | कन्नड | ४.०० |
| ३९ | छत्रपती संभाजीनगर | पैठण | ४.०० |
| ४० | छत्रपती संभाजीनगर | वैजापूर | ४.०० |
| ४१ | धाराशिव | परंडा | ४.०० |
| ४२ | बुलढाणा | बुलढाणा | ४.०० |
| ४३ | नागपूर | रामटेक | ४.०० |
| ४४ | भंडारा | भंडारा | ४.०० |
| ४५ | यवतमाळ | दिग्रस | ४.०० |

PRATAPSINH
MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.06.29 18:10:56 +05'30'

**(प्रतापसिंह म. खरात)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**